शासकीय तगाई कर्ज माफीबाबत

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.
९८६
12 JAN 1989
जि. प्र. जि. जिल्हाधिकारी

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक : टीएजी १०८८/प्र.क्र. २२१४/म-११,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक ३१ डिसेंबर, १९८८.

वाचा :- १] शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक टीएजी [इएसटी] १०८८/सीआर-२०११/म-११, दिनांक २५ एप्रिल, १९८८.

२] शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक टीएजी १०८८/ प्र.क्र.-२११४/म-११, दिनांक ८ सप्टेंबर, १९८८.

शासन निर्णय :- तगाई खातेदारांना, शासकीय तगाई कर्जात सवलती/माफी देण्याबाबतचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. तगाई खातेदारांना, शासकीय तगाई कर्ज फेडीसाठी शासनाने काही सवलती उपरिनिर्दीष्ट शासन निर्णय दिनांक २५.४.१९८८ अन्वये पूर्वीच जाहीर केल्या आहेत. याबाबतीत शासनाने फेर विचार करुन पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे :-

महसूल विभागामार्फत जमिन सुधारणा कर्ज अधिनियम १८८३, शेतकऱ्यांचे कर्ज अधिनियम १८८४, व बीगर शेतकऱ्यांचे कर्ज अधिनियम १९२८ मधील तरतुदीत अनुसरुन वेगवेगळ्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आलेल्या सर्व तगाई कर्जापोटी खातेदारांकडून देय असलेल्या अद्यावत कर्जाच्या रक्कमेची [व्याजासह] वसूली माफ करण्यात यावी.

२. महसूल विभागामार्फत जमिन सुधारणा कर्ज अधिनियम, १८८३, शेतकऱ्यांचे कर्ज अधिनियम, १८८४ व बिगर शेतकऱ्यांचे कर्ज अधिनियम, १९२८ मधील तरतूदीत अनुसरुन ज्या वेगवेगळ्या प्रयोजनासाठी तगाई कर्ज मंजूर करण्यात येतात, त्या तगाई कर्जामध्ये खाली उल्लेखिलेल्या योजनांचा मुख्यत: समावेश होतो :-

[१] शेती विषयक कर्ज

१] जमिन सुधारणा तगाई.
२] विहिर तगाई.
३] बैल तगाई.
४] सर्वसाधारण तगाई [अ] चारा [ब] खावटी.
५] पंपसेट/ऑईल इंजिन.
६] उपसा जलसिंचन [पुणे, सातारा व कोल्हापूर जिल्हे]
७] घरबांधणी तगाई.
८] जकीत तगाई.
९] बी-बियाणे तगाई.
१०] अधिक धान्य पिकवा.

[२] बिगर शेती कर्जे :-

१] नैसर्गिक आपत्तीचे संदर्भात खालील कारणासाठी देण्यात आलेली कर्जे [भूकंप, आग, पूर, मारपीट, वादळ, अतिवृष्टी वगैरे]

अ] घरदुरुस्ती/पुनर्बांधणी.

ब] जनावरे खरेदीसाठी

क] व्यवसायाचे पुनर्वसन.

जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तगाई थकबाकीच्या माहितीच्या आधारे दिनांक ३१.७.१९८८ रोजी अंदाजे २९,९५,७१४ खातेदारांकडे एकूण रुपये ७७,३९,०१,०००/- [रुपये ५२,७०,११,०००/- मुद्दल + रुपये २४,६८,९०,०००/- व्याज] एवढी तगाई थकबाकी होती. जिल्हाधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेल्या तगाई कर्जाची माहिती प्रपत्र-१ मध्ये देण्यात आली आहे. खातेदारांच्या उपरोक्त संख्येत तसेच तगाई थकबाकीच्या वर उल्लेखिलेल्या रक्कमेत काही प्रमाणात फरक होण्याची शक्यता आहे. तसेच शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार अद्यावत कर्जाची [म्हणजे दिनांक ७.११.१९८८ पर्यन्त] तगाई कर्जाच्या रक्कमेची [व्याजासह] वसुली माफ करावयाची आहे. त्यामुळे सर्व तगाई खाती दिनांक ७.११.१९८८ पर्यन्त अद्यावत करुन त्याप्रमाणे तगाई खातेदाराकडून देय असलेली अद्यावत कर्जाची रक्कम माफ करण्यात आली आहे, असे समजावयाचे आहे.

३. उपरोक्त शासनाच्या आदेशाची अंमलबजावणी तालुका पातळीवर तगाईखाती बंद करुन तहसीलदारांनी करावयाची आहे. कर्ज माफीचे उपरोक्त आदेश शासन स्तरावर काढण्यात आले असल्यामुळे याबाबत महसूल अधिकाऱ्यांना आणखी अधिकार प्रदान करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

४. शासनाच्या आदेशाची तहसीलदारांनी तालुका पातळीवर अंमलबजावणी केल्यानंतर त्यासंबंधी महालेखापाल मुंबई/नागपूर यांना त्यांचेकडील हिशेबाच्या पुस्तकात आवश्यक ते समायोजन [ debit and credit ] करण्यासाठी निर्लेखित करावयाच्या रक्कमेचा तालुकावार व योजनावार तपशील विहित नमुन्यात पाठविण्यात यावा. तसेच उपरोक्त माहितीचा गोषवारा योजनावार जिल्हाधिकाऱ्यांनी सोबत जोडलेल्या प्रपत्र-दोन मध्ये शासनाकडे पाठवावा.

५. प्रत्येक तहसील कार्यालयात चालू असलेली तगाई खाती अद्यावत करणे, बंद करणे तसेच ती नंतर तारण गहाणाचा बोजा किंवा जामिन [ collateral security ] रद्द करणे आणि रक्कम निर्लेखित करणे व इतर तदनुषंगाने निर्माण होणारी कामे तात्काळ करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१] प्रत्येक तालुक्यातील तगाई नमुना नंबर ३[तीन] अद्यावत आणून नंतर शासनाच्या ह्या आदेशान्वये रक्कम माफ केल्याचा शेरा मारुन खाती बंद करण्यात यावीत.

२] प्रत्येक खातेदारास त्यांच्या कडील माफ करण्यात आलेल्या तगाई कर्जाबाबत व तारण बोजा [असल्यास] जामिन रद्द करण्यात येत असल्याचे पत्र सोबत जोडलेल्या प्रपत्र-३ मध्ये देण्यात यावे व त्या पत्राची प्रत संबंधित तलाठी व दुय्यम निबंधक यांना पृष्ठांकित करण्यात यावी.

३] संबंधित तलाठ्यांना, सर्कल/तालुका कार्यालयात एकत्र बोलावून वर दोन मध्ये नमूद केलेल्या पत्राचे प्रती प्रमाणे तगाई कर्जाचा जमिनीवरील बोजा दूर करण्या-बाबतच्या फेरफार नोंदी गाव नमुना नंबर "सहा" मध्ये घेण्यात याव्यात, तसेच संबंधित अधिकाऱ्यांकडून सदर नोंदी मंजूर करुन घेऊन त्याचा अंमल तात्काळ ७/१२ ला देण्यात यावा. याबाबतीत खातेदारांस वेगळी नोटीस देण्याची आवश्यकता नाही.

४] महालेखापाल यांना रक्कमेचे समायोजन [ Debit and Credit ] करणे शक्य व्हावे म्हणून प्रत्येक तालुकावार व योजनावार मुद्दलाच्या निर्लेखित करावयाच्या रक्कमेचा तपशील संबंधित महालेखापालाकडे पाठवावा. व्याजाच्या रक्कमेचे समायोजन महालेखापालांचे पातळीवर करण्याची आवश्यकता नाही.

५] तदनुषंगाने उपस्थित होणारी इतर कामे, तात्काळ करुन घेण्यात यावी.

६] या कामावर देखरेख करण्यासाठी प्रत्येक तालुक्याची जबाबदारी उपजिल्हाधिकाऱ्यांच्या श्रेणीच्या अधिकाऱ्यांवर टाकण्यात यावी, व त्यांचेकडून दर पंधरवड्यास प्रगती अहवाल प्राप्त करुन जिल्ह्याचा एकत्रित पाक्षिक अहवाल सोबत जोडलेल्या प्रपत्र-चार मध्ये शासनास सादर करावा.

७] वरील सर्व कामे फेब्रुवारी, १९८९ पर्यन्त पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची राहील.

६. निर्लेखित केलेल्या तगाई कर्जाची रक्कम जर वसूल झाली असती तर सदर रक्कम लेखाशिर्ष "६४०१-पीक संवर्धन विषयक कर्जे-८००-इतर कर्जे-८००[एक] शेतकऱ्यांना तगाई कर्जे" या खाली जमा झाली असती, सदर रक्कम या निर्णयान्वये निर्लेखित करण्यात येत असल्यामुळे "मागणी क्रमांक सी-१७-२४०१-पीक संवर्धन-७९५-वसूल न करता येण्याजोगी कर्जे निर्लेखित करणे" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावी व तद्संबंधीचा खर्च त्या लेखाशिर्षाखाली चालू वित्तीय वर्षांत केलेल्या अनुदानातून भागवावा. हा खर्च दुसरीकडे जमा रकमेने "६४०१-पीक-संवर्धन विषयक कर्जे-८०० इतर तगाई अग्रीमे" [जमा] वसूल व जमा संबंधिच्या लेखाशीर्षाखाली जमा दाखवावा.

७. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८७६/अर्थसंकल्प-४, दिनांक २९.११.१९८८ व संदर्भ क्रमांक १३३५/८८/व्यय-९, दिनांक १४.१२.१९८८ ला अनुसरुन रवाना करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

र. सि. नेगी,
शासनाचे उपसचिव, महसूल व वन विभाग.

प्रपत्र - १

**जिल्हाधिकारी यांजकडून उपलब्ध झालेल्या शेतकरी/शेतमजूर यांचेकडील तगाई कर्जाची माहिती**

[रुपये लाखांत]

| अ.क्र. | जिल्ह्याचे नाव | एकूण खातेदार | तगाई बाकी मुद्दल | व्याज | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ठाणे | ३५,०५६ | ६.२९ | ५.९२ | १२.२१ |
| २ | रायगड | ३४,२५५ | ११.४४ | ७.८० | १९.२४ |
| ३ | रत्नागिरी | ७,३२३ | २२.५० | ८०.८९ | १०३.३९ |
| ४ | सिंधुदुर्ग | ३२० | ४.०८ | ०.७८ | ४.८६ |
| | कोकण विभाग | ७६,९५४ | ४४.३१ | ९५.३९ | १३९.७० |
| ५ | नाशिक | १,७५,२१९ | १५३.८५ | ४४.०५ | १९७.९० |
| ६ | धुळे | ५१,१११ | ५८.६३ | ४५.५९ | १०४.२२ |
| ७ | जळगाव | ३८,५८२ | ३५.८७ | ३७.९२ | ७३.७९ |
| ८ | अहमदनगर | २,१८,३९१ | १८१.३० | ६२.८० | २४४.१० |
| | नाशिक विभाग | ४,८३,३०३ | ४२९.६५ | १९०.३६ | ६२०.०१ |
| ९ | पुणे | ८२,२९७ | १९१.९१ | ११७.१७ | ३०९.०८ |
| १० | सातारा | २८,६७५ | १२०.७२ | ७०.५८ | १९१.३० |
| ११ | सांगली | ५१,२८९ | ९७.८१ | २४.०८ | १२१.८९ |
| १२ | कोल्हापूर | ४१,२२९ | १०१.८१ | २१५.०४ | ३१६.८५ |
| १३ | सोलापूर | २४,९१४ | ५९५.८० | १५९.६० | ७५५.४० |
| | पुणे विभाग | ३,२८,४०४ | १,१०८.०५ | ५८६.४७ | १,६९४.५२ |
| १४ | औरंगाबाद | २,४४,९८३ | २२०.८२ | १०७.८४ | ३२८.६६ |
| १५ | बीड | १,६४,६७३ | १६९.१७ | ८४.६९ | २५३.८६ |
| १६ | नांदेड | ४,२७,९४६ | ३५६.५३ | २२७.४७ | ५८४.०० |
| १७ | परभणी | १,४४,५९७ | ९१.३९ | ४५.२० | १३६.५९ |
| १८ | उस्मानाबाद | २,३८,५३१ | १४८.७६ | ६४.७४ | २१३.५० |
| १९ | लातूर | १,२३,३३२ | ११०.४६ | ५०.२४ | १६०.७० |
| २० | जालना | १,६३,७६३ | १७५.८८ | ८७.५७ | २६३.४५ |
| | औरंगाबाद विभाग | १५,०७,८२५ | १,२७३.०१ | ६६७.७५ | १,९४०.७६ |
| २१ | अमरावती | ७०,८३० | १३६.५८ | ७९.८२ | २१६.४० |
| २२ | अकोला | १,०२,३०८ | ३३६.०१ | १००.३८ | ४३६.३९ |
| २३ | बुलढाणा | १,११,५३७ | ४३२.५९ | १५३.१७ | ५८५.७६ |
| २४ | यवतमाळ | १,४८,५२५ | ८३९.१३ | २२५.७४ | १,०६४.८७ |
| | अमरावती विभाग | ४,३३,२०० | १,७४४.३१ | ५५९.११ | २,३०३.४२ |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| २५ | नागपूर | ४९,७९४ | १०७.४५ | ९८.९६ | २०६.४१ |
| २६ | चंद्रपूर | ३५,९११ | १३०.४८ | ६९.२५ | १९९.७३ |
| २७ | वर्धा | ६०,२३७ | २५८.४८ | ११२.३५ | ३७०.८३ |
| २८ | भंडारा | ४४,२६८ | १६५.१३ | ८६.४५ | २५१.५८ |
| २९ | गडचिरोली | ५,८१८ | ९.२४ | २.८१ | १२.०५ |
| नागपूर विभाग | | १,९६,०२८ | ६७०.७८ | ३६९.८२ | १,०४०.६० |
| | एकूण ... | २९,९५,७१४ | ५,२७०.११ | २,४६८.९० | ७,७३९.०१ |

## प्रपत्र - २

### योजनावार तगाई मुद्दल व व्याज माफ केल्याबद्दलची माहिती

जिल्हा :

| अ.क्र. | योजना | माफ केलेली रक्कम | | |
|---|---|---|---|---|
| | | मुद्दल | व्याज | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ |

प्रपत्र - ३

क्रमांक ----------------------------------------

तहसीलदार कार्यालय, ----------------------

दिनांक :

प्रति

श्री. ----------------------------------------

रा. ---------------------- तालुका ---------------------- जिल्हा ----------------

विषय :- शेती सुधारणा, बैल, विहीर, चारा, छावटी, उपसा जलसिंचन, अधिक धान्य पिकवा, इंजिन पंप/ऑईल, जबीत, घरासाठी - तगाई कर्जात माफी --

मौजे ---------------------- तगाई खाते क्र. ------

महोदय,

दिनांक ७-११-१९८८ रोजी आपणाकडे शिल्लक असलेल्या ---------------------- ---------------------- मधील मुद्दल रक्कम रुपये ---------- तगाई, कर्ज खाते क्रमांक ---------------------- अशी एकूण रक्कम रुपये ---------- अधिक व्याज रक्कम रुपये ---------------------- एवढी रक्कम शासनाने आपणांस माफ केली आहे.

२. या तगाई कर्जासाठी आपण तारण दिलेल्या जमिनीवरील बोजा दूर करण्याबद्दल गाव नमुना नंबर ६ ला नोंद घेण्यात आलेली असून आपल्या जमिनीवरील बोजा दूर करण्याबद्दल तलाठ्यांना या पत्राच्या नकलेव्दारे सूचना देण्यात येत आहेत. हे पत्र बोजा दूर करण्याबद्दल घावयाच्या फेरफाराची नोटीस समजून आपल्या भागातील संबंधित तलाठ्यांशी संपर्क साधावा. [जमीन तारण दिली असल्यास, हा परिच्छेद ठेवावा.] याची कृपया नोंद घ्यावी.

आपला,

तहसीलदार.

[कृ. मा. प.

एच-७६७[१५००-१-८९]४-अ.

प्रतिलिपी -

१] दुय्यम निबंधक, ____________________

२] तलाठी, सजा ____________________

____________________ यांसी ____________

२. उपरिनिर्दिष्ट तगाई खातेदारांकडील तगाई कर्ज माफ करण्यास शासनाने मंजुरी दिली असल्यामुळे या तगाई कर्जासाठी तारण म्हणून देण्यात आलेल्या जमिनी-वरील तारणाचा बोजा कमी करण्यासंबंधी गाव नमुना नंबर ६ ला नोंद घालून ती मंजूर करून घ्यावी व त्याचा अंमल ७/१२ ला तात्काळ करण्यात यावा व पूर्तता रिपोर्ट पाठवावा.

____________________

तहसीलदार ____________________

____________________

प्रपत्र - ४

प्रातिनिधिक

## तगाई कर्जमाफीचे संदर्भात केलेल्या प्रगतीचा अहवाल

जिल्हा :- दिनांक अखेर

| अ. क्र. | तालुका | एकूण तगाई खाती | बंद केलेली खाती | | एकूण बंद केलेली खाती |
|---|---|---|---|---|---|
| | | | यापूर्वी बंद केलेली खाती | चालू पंधरवड्यात बंद केलेली खाती | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

| खातेदारांना दिलेली पत्रे | | | गाव नमुना नंबर ६ ला घेतलेल्या नोंदी | | |
|---|---|---|---|---|---|
| यापूर्वी दिलेली | चालू पंधरवड्यात दिलेली | एकूण | यापूर्वी केलेल्या | चालू पंधरवड्यात | एकूण |
| ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |

| मंजूर केलेल्या नोंदी | | | ७/१२ ला दिलेला अंमल | | |
|---|---|---|---|---|---|
| पूर्वी केलेल्या | चालू पंधरवड्यात | एकूण | पूर्वी दिलेला | चालू पंधरवडा अखेर | एकूण |
| १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ |

| योजनावार पत्रके | | | शेरा |
|---|---|---|---|
| पूर्वी केलेली | चालू पंधरवडा | एकूण | |
| १९ | २० | २१ | २२ |

==x==x==x==

एच-७६७[ १५००-१-८९ ]५-अ.